जय भवानी मित्र मंडळाच्यावतीने विश्वी ते केनवड कावड यात्रा उत्साहात संपन्न >>पान 2

बावनदीच्या रौद्र रुपाने वांद्री-उक्षी परिसरात दुसऱ्या दिवशीही पूरस्थिती, शेतकरी हवालदिल >>पान 3

शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवस औचित्याने मेहकरमध्ये कांगणे सरांचे मोलाचे मार्गदर्शन >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

**सुविचार**
आपले ध्येय निश्चित ठेवा.



आमदार सिध्दार्थ खरात यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 30 ■ बुधवार, दि. 20 ऑगस्ट 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## ताडशिवनी व्हाया मंत्रालय

# आमदार सिद्धार्थ खरात यांचा चिखल मातीच्या मार्गावरील खडतड प्रवास



**मेहकर : कमवणारे कमी अन् खाणारे जास्त असल्याने सर्वांचीची आबाळ... अंगावर कपडा नाही. पाच चिल्या पिल्लांची पोटाची खळगी भरताना होत असलेली तानातून अशा एक ना अनेक समस्यांचा डोंगर पार करीत अन् शेणा मातीच्या घरात आणि चिखलाच्या खेळात आपुलकीचे संस्कार झालेल्या आणि बालपणापासूनच जिद्दी असलेल्या सिद्धार्थ खरात यांचा जीवन प्रवासा अत्यंत खडतर आहे.मात्र, संकटांना न घाबरता किंवा त्याचा बागुलबुवा न करता इच्छाशक्ती, प्रचंड मेहनत आणि जिद्दीच्या बळावर सिद्धार्थ खरात यांचा प्रवासा अंगावर शहारे आणणारा आहे.ताडशिवणी व्हाया मुंबई ते मंत्रालय आणि अधिकारी ते लोकप्रतिनिधी असा प्रवास आमदार सिद्धार्थ खरात यांनी केवळ स्वत:च्या जिद्द व चिकाटीच्या बळावर पूर्ण करून केला आहे. विशेष म्हणजे यशाची गगन भरारी घेतल्यानंतर त्यांनी आपली नाळ मातीशी कायम ठेवली आहे. गावाकडची साधीभोळी माणसं.. सवंगड्या सोबत खाल्लेली चटणी भाकर कायम डोळ्यासमोर ठेवून त्यांच्यासोबत आपुलकीचे नाते कायम ठेवले आहे. त्यामुळे आमदार सिद्धार्थ खरात यांचा प्रवास हा बालपणापासून आवडता विद्यार्थी तर आता आवडता लोकप्रतिनिधी म्हणून एक आदर्शवत राहिला आहे.**

सिंदखेडराजा तालुक्यातील एक खेडेगाव गावात केवळ प्राथमिक शिक्षणाची सुविधा त्यानंतर कोणत्याही सोयी सुविधा नाहीत. घरी अठरा विश्व दारिद्र्य. सुतार काम करून कुटुंबाची उदरनिर्वाह करताना वडिलाची होणारी घालमेल. अनेक समस्यांचा डोंगर उभा असताना आमदार सिद्धार्थ खरात यांचे वडील यांनी सुतारकाम करून कुटुंबाचा प्रपंच चालवला. आई निरक्षर मात्र, वडील तेव्हा चौथा वर्गापर्यंत शिकलेले. मात्र नोकरी नाही, त्यामुळे त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. आमदार सिद्धार्थ खरात यांना दोन भाऊ व पाच बहिणी असा परिवार होता. त्यामुळे कोणतीही गरज वेळेवर पूर्ण होईल याची शाश्वती नव्हती. अशा काळात सिद्धार्थ खरात यांनी वर्ग पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण ताडशिवणी गावात घेतले. त्यानंतर आठ ते दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या किनगावराजा येथे दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले.

किनगावराजा येथे जाण्यासाठी कोणतेही दळणवळणाची सुविधा नव्हती. माळराणाचा रस्ता नाल्या खोल्या दरीने रस्ता काढत आणि रस्त्यावर दगड धोंडे अशी वाट तरीही आमदार सिद्धार्थ खरात यांनी या संकटाचा बागुलबुवा न करता आलेल्या संकटांना सामोरे जात माळराणाचा रस्ता तुडवून शिक्षण पूर्ण केले.जिद्द व प्रचंड मेहनती सुरुवातीची बालपणापासूनच वृत्ती असल्याने त्यांनी शिक्षण घेताना वर्गामध्ये आपला पहिला नंबर कायम ठेवला. मॉनिटर म्हणून बालपणापासूनच वर्गाची जबाबदारी सांभाळली. तर, आता ते लोकप्रतिनिधी आमदार म्हणून उत्कृष्टरित्या जबाबदारी पार पाडत आहेत. सुरुवातीपासून चाणक्ष असलेले सिद्धार्थ खरात शिक्षकांचे आवडते विद्यार्थी म्हणून होते माध्यमिक शिक्षण पूर्ण करताना कधी त्यांच्या पायात चप्पल अथवा जोडा नव्हता. अनवाणी पायाने चालावे लागत होते. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये तर, पळसाचे पाने पायाला बांधून वाट पार करावी लागत होती. हा प्रवास करताना डोळ्यातून अनेक वेळा अश्रू ही गळले.

मात्र, तेव्हाचे गळालेले अश्रू असून आताचे आनंदाश्रू झाले आहेत. किनगवराजा येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी तेव्हाचे औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथील मिलिंद विद्यालयामध्ये पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला. त्या ठिकाणी ही त्यांना अनेक अडी अडचणीचा सामना करावा लागला. मात्र, त्यांनी त्या अडीअडचणी परिवारासमोर कधी येऊ दिल्या नाहीत. घरून फारसा पैसा पुरवला जात नव्हता त्यामुळे त्यांनी मधल्या काळात सिल्लोड मध्ये शिक्षक म्हणून नोकरी सुरू केली. मात्र, तेथे फारसे रमले नाहीत. नंतर नोकरी सोडून औरंगाबाद या ठिकाणी गेले त्या ठिकाणी पेपर वाटण्याचे काम केले आणि त्याच काळात यूपीएससी एमपीएससी चे शिक्षण स्पर्धा परीक्षेचे तयारी केली सुरुवातीला एक दोन वेळा यामध्ये अपयश आले. मात्र, खचून न जाता त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरूच ठेवली. पुढे ते पीएसआय झाले १९९२ मध्ये त्यांनी खिल्लारी भूकंपाच्या काळात बंदोबस्तासाठी आपले कर्तव्यही पार पाडले. मात्र, तेथेही ते रमले नाहीत. त्यांनी पीएसआय पदाची नोकरी सोडून मंत्रालयामध्ये सहसचिव म्हणून नोकरी स्वीकारली. त्या ठिकाणी तब्बल २७ ते २८ वर्ष सेवा दिली आणि तेथेही नोकरी करताना गावाकडे सतत येणे जाणे असल्याने गावातील समस्या त्यांना नेहमीच अस्वस्थ करून गेल्या. गावाकडे असलेल्या नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी नोकरी सोडून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. आपले व्हिजन लोकांना पटवून दिले आणि पहिल्याच प्रयत्नात त्यांनी यश संपादन केले. त्यामुळे आमदार सिद्धार्थ खरात यांचा अगदी पहिली ते लोकप्रतिनिधी पर्यंतचा प्रवास हा अत्यंत श्रमाचा राहिला आहे. मात्र, आपल्या जिद्द व चिकाटीच्या बळावर त्यांनी यश संपादन करून आपले ध्येय गाठले आहे.

## वारकरी संप्रदायाशी भावनिक नाते

सिद्धार्थ खरात यांना बालपणापासून गायनाची आवड होती. प्रचंड इच्छाशक्ती बरोबरच त्यांचे भक्तीवरही श्रद्धा होती. त्यामुळे ते गावाकडे आले की मंदिरामध्ये जायचे, त्या ठिकाणी भजन गायन करायचे. त्यामुळे त्यांचे नाते हे वारकरी संप्रदायाशी जुळून राहिले आहे.तर त्यांनी मंत्रालयात असताना गावातील भजनी मंडळींना टाळ मृदंग पेटीचे साहित्य घेऊन देत त्यांच्या आनंदात भर घातली आहे. आज सिद्धार्थ खरात आमदार असतानाही वारकरी संप्रदायाशी जुळून आहेत.



## मित्रमंडळीचा कडून शुभेच्छा वर्षाव

आमदार सिद्धार्थ खरात यांचा १५ ऑगस्ट रोजी वाढदिवस होता.वाढदिवसाचे औचित्य साधून आपला विदर्भचे मुख्य संपादक देविदास खनपटे यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या मूळगावी जाऊन त्यांच्या सवंगड्याशी संवाद साधला. सवंगड्यांनी त्यांच्या बालपणापासून ते कॉलेज पर्यंतच्या आठवणींना उजाळा देत जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या!



**देविदास खनपटे**
मुख्य संपादक / मो : ९७६७२३३०३४

## घार उडते आकाशी चित्त तिचे पिलापाशी

जीवनात कितीही यशाची उंची गाठली तरी घर आणि गावातील गावपण विसरल्या जात नाही. असाच काहीसा प्रवास आमदार सिद्धार्थ खरात यांचा राहिला आहे. शिक्षणानिमित्त बाहेरगावी आणि नंतर मुंबईसारख्या मेट्रो सिटी आणि मंत्रालय सहसचिव पदावर नोकरी करत असताना आमदार सिद्धार्थ खरात यांचे मन सतत गावाकडे वळत होते. त्यामुळे कार्याप्रसंगी अथवा वेळ मिळेल तसा गावाकडे त्यांचे येणे जाणे असायचे गावाकडे आल्यानंतर प्रत्येकाची असते विचारपूस करायचे आणि प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी ते मार्गदर्शन करायचे. शेती हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असल्याने शेतीमध्ये काय बदल करावे याबाबत ते सतत थोरले बंधू असो किंवा इतर मित्रमंडळींना मार्गदर्शन करायचे. आपल्याबरोबरच आपल्या सोबतचे सवंगडी सुद्धा आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे, यासाठी ते सतत मार्गदर्शन करत. मुंबईतील आकाशाला भिडणाऱ्या इमारतीत वास्तव्य असतानाही ज्याप्रमाणे घार आकाशी उडते आणि तिचे चित्त हे पिल्यापाशी राहते तसाच काहीसा प्रकार हा आमदार सिद्धार्थ खरात यांचा राहिला आहे. मुंबई आणि मेट्रो सिटीत पद.. पैसा.. प्रतिष्ठा.. असतानाही ते नेहमीच मात्र गावात रमले.त्यामुळे त्यांची गावाची नाळ कायम जुळून राहिली आहे.

## भारतीय माहिती क्रांतीचे जनक राजीव गांधी

आज २० ऑगस्ट, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची आज ८१ वि जयंती. राजीव गांधी यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हटले जाते. आधुनिक विचार आणि कठोर निर्णयामुळे राजीव गांधी यांनी जगात भारताची वेगळी ओळख निर्माण केली. २० ऑगस्ट १९४४ रोजी जन्मलेले राजीव गांधी हे भारताचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी राजीव गांधी हे भारताचे पंतप्रधान बनले. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान असलेल्या इंदिरा गांधी यांचे जेष्ठ सुपुत्र असलेले राजीव यांना राजकारणात रस नव्हता. देशातील सर्वात प्रतिष्ठित राजकीय घराण्यात जन्म घेऊनही राजीव गांधी हे राजकारणापासून दूरच होते. राजीव गांधी यांचे शिक्षण डेहराडूनच्या शाळेत झाले त्यानंतर ते हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या डुन च्या निवासी शाळेत दाखल झाले. तिथे त्यांना अनेक मित्र भेटले या मित्रांशी त्यांनी आयुष्यभर मैत्री जपली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते केम्ब्रिजच्या ट्रीनीटी महाविद्यालयात गेले पण लवकरच लंडन स्थित इम्पेरियल महाविद्यालयात प्रवेश घेतला. तिथे त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचा अभ्यास केला. त्यांना विज्ञान, तंत्रज्ञान या विषयात खूप रस होता ते या विषयाची पुस्तके वाचून काढत. विमान उड्डाण करून आकाशात उडावे अशी त्यांची इच्छा होती त्यासाठी त्यांनी वैमानिक होण्याचा निर्णय घेतला. इंग्लंडमध्ये त्यांनी फ्लायिंग क्लबची परीक्षा दिली आणि वैमानिक बनले. लगेचच ते इंडियन एअर लाईन्सचे देशांतर्गत सेवेचे वैमानिक बनले. लंडनमध्येच त्यांची आणि सोनिया गांधी यांची मैत्री झाली मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले आणि १९६८ साली त्यांचा विवाह झाला. राजीव गांधी हे अपघातानेच राजकारणात आले. १९८० साली राजीव गांधी यांचे बंधू संजय गांधी यांचा अपघातात मृत्यू झाला. संजय गांधी यांच्या मृत्यूनंतर राजीव गांधी यांनी राजकारणात प्रवेश करावा अशी मागणी काँग्रेस मधील नेत्यांकडून होऊ लागली. आई इंदिरा गांधी यांनीही राजीव गांधी यांना राजकारणात उतरण्याची सूचना केली तेंव्हा राजीव यांनी आपल्या भावाच्या संजय गांधी यांच्या अमेठी या मतदारसंघातुन निवडणूक लढवली व मोठ्या मताधिक्याने ती जिंकली. १९८२ साली दिल्लीत भारताने आशियाई क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले. या स्पर्धेच्या नियोजनाची सर्व जबाबदारी राजीव गांधी यांच्याकडे होती त्यांनी ती यशस्वीरीत्या पेलून ही स्पर्धा यशस्वी केली. ३१ नोव्हेंबर १९८४ इंदिरा गांधी यांची हत्या झाली. हत्या झाली तेंव्हा इंदिरा गांधी या देशाच्या पंतप्रधान होत्या त्यामुळे मोठा घटनात्मक पेच निर्माण झाला. पंतप्रधानपदासारखे देशातील सर्वोच्च पद जास्त दिवस रिक्त ठेवता येणार नाही असे घटना तज्ज्ञांचे मत होते त्यामुळे त्यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली. वैयक्तिक पातळीवर दुःख असूनही त्यांनी पंतप्रधान पदाची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडली. त्यानंतर झलेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेस पक्षाला एकतर्फी विजय मिळवून दिला. या निवडणुकीत काँग्रेसला ४०० हुन अधिक जागा मिळाल्या. स्वतः राजीव गांधी हे विक्रमी मतांनी जिंकून आले होते. पंतप्रधान असताना त्यांनी देशात अनेक क्रांतिकारक निर्णय घेतले. देशाला महासत्ता व्हायचे असेल तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशाने प्रगती करायला हवी असे त्यांचे मत होते. २१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचे असेल त्यासाठी देशातील प्रत्येक तरुण हा संगणक साक्षर असायला हवा असा त्यांचा आग्रह होता त्यामुळेच त्यांनी देशात संगणक आणला. स्वभावाने गंभीर पण आधुनिक विचाराच्या राजीव गांधी यांनी देशात माहिती तंत्रज्ञान युगाची मुहूर्तमेढ रोवली त्यामुळेच त्यांना भारतीय माहिती क्रांतीचे जनक असे म्हणतात. देशाला माहिती तंत्रज्ञानात परिपूर्ण करून महासत्ता बनवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या पंतप्रधानाचे २१ मे १९९१ रोजी लिट्टे या दहशतवादी संघटनेने मानवी बॉम्बचा वापर करून हत्या केली म्हणून तो दिवस देशभर दहशतवादी विरोधी दिवस म्हणूनही पाळण्यात येतो. राजीव गांधी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# जय भवानी मित्र मंडळाच्यावतीने विश्वी ते केनवड कावड यात्रा उत्साहात संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**केनवड /प्रतिनिधी:** : १७ ऑगस्ट २०२५ रोज शुक्रवार ला विश्वी ते केनवड कावड यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. जय भवानी मित्र मंडळ म्हटले की केनवड व पंचक्रोशात अग्रगण्य अस नाव लौकिक व सर्व सामाजिक क्षेत्रात नावलौकिक असलेले मंडळ अशी त्यांची ख्याती. दरवर्षी सन उत्सव असोत, सामाजिक उपक्रम असोत त्यामध्ये मंडळातील सर्व सदस्य मनोरमी अशा नवनवीन प्रोत्साहित समाजप्रबोधक कार्यक्रमांसाठी प्रयत्नशील असतात.

याही वर्षी केनवड मंडळाच्या वतीने प्रथमच कावड यात्रेचे नियोजन करण्यात आले होते. सर्व प्रथम कावड यात्रेची सुरवात केनवड येथील प्रसिद्ध असेलेले जागृत देवस्थान म्हणजे श्री गुप्तेश्वर संस्थान या ठिकाणी दर्शन घेऊन झाली. जय भवानी मंडळ व गावकरी मंडळी यांच्यासह मोठ्या संख्येने दर्शन घेऊन





''हर हर महादेव'' या गजरात ग्राम प्रदक्षिणा करण्यात आली व त्वदतच कावड श्री तीर्थक्षेत्र विश्वी जिल्हा बुलढाणा येथे मार्गस्थ झाली.

विश्वी येथे पोहचताच वरून राजाने कावडीचे कडाडीच्या व मुसळधार पावसाने स्वागत केले.विश्व येथे दर्शन घेऊन भर पावसात पंचक्रोशात केनवड कडे कावड मोठ्या उत्साहात निघाली.. रस्त्यामध्ये विविध ठिकाणी (विश्वी,विठ्ठलवाडी बेलगाव) नाश्त्याची फराळाची व चहाची व्यवस्था करण्यात आलेली होती. मोठ्या उत्साहात स्थानिक नागरिक कावड यात्रेमध्ये सहभाग घेऊन आनंद घेत होते. जय भवानी मित्र मंडळाचे सर्व सहकारी अद्भुत अशी पारंपारिक कावड नियमबद्ध पद्धतीने समोर चालत होते. कावड १९ ऑगस्ट २०२५ रोज सोमवारला गावामध्ये पोहोचली. केनवड येथे पोहोचताच भव्य दिव्य असे स्वागत गावामध्ये करण्यात आले.. मंडळाच्या वतीने गावात पारंपारिक शिस्तबद्ध कावड प्रदर्शन करण्यात आले.

केनवड येथील जागृत श्री गुप्तेश्वर संस्थान इथे विश्व तीर्थक्षेत्रावरून आणलेल्या जलाने श्री गुप्तेश्वर मंदिरामध्ये अभिषेक करून सर्व गावकऱ्यांच्यावतीने आरती व पूजन करून कावडची सांगता करण्यात आली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी संस्थान येथे कावड यात्रेनिमित्त गेलेल्या सर्व मंडळींची भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. त्यावेळी ताल व टाळ्यांच्या गजरात विठ्ठल रुक्मिणी मंदिर व परिसर भक्तीमय झाला होता. जय भवानी मित्र मंडळाच्या वतीने केलेल्या या कावडीचे आयोजन व गावकऱ्यांचा त्यांना लाभलेला अथांग असा प्रतिसाद एक प्रकारे पुढील सामाजिक कार्यासाठी त्यांना पाडबळ देणारा ठरणार आहे. त्यामुळे मंडळामध्ये आणि गावांमध्ये व पंचक्रोशामध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले..

## कुर्ला लाल बहादूर शास्त्री मार्गावर मोठ्या प्रमाणात साचले पाणी



- कुर्ला लाल बहादूर शास्त्री मार्गावर मोठ्या प्रमाणात पाणी
- मोठ्या प्रमाणात पाणी साठा झाल्यामुळे दोन्ही मार्गिका बंद
- दुकानात देखील मोठ्या प्रमाणात पाणी
- पाण्याचा साठा जास्त झाल्यामुळे चार चाकी पाण्याखाली

## शिरपूरात बलात्कार प्रकरणा विरोधातील मुक मोर्चा हिंसक

दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : दहिवद (ता. शिरपूर) येथे १५ ऑगस्ट रोजी घडलेल्या आठ वर्षांच्या बालिकेवरील बलात्कार प्रकरणाविरोधात शिरपूर शहरात काढण्यात आलेला मुक मोर्चा अचानक हिंसक वळणावर गेला. संतप्त तरुणांनी गुजराती कॉम्प्लेक्स परिसरात रास्ता रोको करत आरोपीस तात्काळ फाशीची मागणी करत घोषणाबाजी केली. दरम्यान परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर तरुणांनी धाव घेतली आणि पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्यावर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात हिरे जखमी झाले असून त्यांच्यावर गुरुवेद रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सकाळी अकराच्या सुमारास चोपडा जिन परिसरातून सुरू झालेल्या या मोर्चात तब्बल पाच हजारांहून अधिक महिला, पुरुष व तरुण सहभागी झाले होते. मोर्चा शहरातील मुख्य मार्गांवरून जात महात्मा फुले हायस्कूलसमोर पोहोचला. येथे उपविभागीय अधिकारी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. त्यानंतर मोर्चा परतत असतानाच गुजराती कॉम्प्लेक्स येथे काही तरुणांनी अचानक रस्ता अडवून आक्रोश सुरू केला.

पोलिसांनी वारंवार समजावण्याचा प्रयत्न करूनही जमाव आक्रमक झाला. यावेळी लाल रंगाचा शर्ट घातलेल्या तरुणाने अचानक पोलीस निरीक्षक जयपाल हिरे यांच्यावर धारदार शस्त्राने पाठीवर वार केला. या घटनेत इतर पोलिसांनाही धक्काबुक्की करण्यात आली.

हल्ल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई करत अनिल सिताराम पावरा (२०), सागर जहागीरदार पावरा (२०), दिनेश रमेश पावरा (१९), सुनिल लोटन सोनवणे (२३), राहुल संजय भिल (१९), कुणाल सुभाष भिल (१९) आणि जगन सतीष भिल (१९) या सात जणांना ताब्यात घेतले आहे. आता परिसरात परिस्थिती नियंत्रणात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.





ढगफुटी सदृश पावसामुळे शेतकरी उध्वस्त; जनजीवनही विस्कळीत!
रस्ते, पूल, तलाव,कालवे सह ईतर सार्वजनिक मालमत्तेचीही हानी!
आ.सिंद्धार्थ खरात यांनी थेट बांधावर जाऊन पहाणी..!



आदिवासी दिनानिमित्त पहूर येथे आदिवासी भगिनींनी बांधली राखी ..
आदिवासी बहूल खर्या अर्थाने बहुजन असलेल्या पहूरची वेगळी ओळख निर्माण करण्याचा निर्धार या वेळी महिला, गावकरी व सर्वांच्या वतीने करण्यात आला !!



मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अँड पुरुषोत्तम खेडेकर व माजी आमदार रेखाताई खेडेकर यांनी आमदार सिद्धार्थ खरात यांना वाढदिवसाच्या विशेष शुभेच्छा देतानांचा टिपलेला एक क्षण..!



आमदार सिद्धार्थ खरात वारकरी संप्रदायाशी जुळलेली नाळ..!





मेहकर व लोणार तालुक्यात अतिवृष्टी व ढगफुटीमुळे झालेल्या नुकसानीची माहीती मा.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य व मा.श्री मकरंद आबा पाटील , मदत व पुनर्वसन मंत्री यांना दिली व जास्तीत जास्त मदत निधी पूरग्रस्त शेतकरी व सामान्य नागरिकांना देण्यांत यावी अशी मागणी केली..!

लोकप्रिय आमदार सिद्धार्थ रामभाऊ खरात साहेब सोबत प्रसिद्ध अभिनेता भारत गणेशपुरे, श्याम भाऊ उमाळकर राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस, मेहकर पक्षनेते लक्ष्मण दादा घुमरे, काँग्रेस नेते अँड अनंत वानखेडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख प्रा आशिष रहाटे, मेहकर शहर अध्यक्ष किशोरभाऊ गारोळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# बावनदीच्या रौद्र रूपाने वांद्री-उक्षी परिसरात दुसऱ्या दिवशीही पूरस्थिती, शेतकरी हवालदिल

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्याला सलग दुसऱ्या दिवशीही मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे जिल्ह्यातील प्रमुख नद्यांच्या पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. संगमेश्वर तालुक्यातील प्रमुख असलेल्या बावनदीने तर आपले पात्र ओलांडले असून, यामुळे वांद्री आणि उक्षी परिसरामध्ये दुसऱ्या दिवशीही पूरस्थिती कायम आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. उक्षी मुस्लिम मोहल्ला आणि रेल्वे स्टेशनकडे जाणारे दोन्ही महत्त्वाचे रस्ते पूर्णपणे पाण्याखाली गेले



आहेत, ज्यामुळे स्थानिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पुराचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतीत पुराचे पाणी आणि सोबत आलेला चिखल मोठ्या प्रमाणात साचला आहे. यामुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. बावनदीची सध्याची पाणीपातळी ८.७७ मीटर एवढी आहे.या पुरामुळे शेतीत घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून, रोगराई पसरण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने मदतकार्य सुरू करून शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करावी आणि त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकरी करत आहेत. पाऊस असाच सुरू राहिल्यास परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे.

## पंचनाम्याचे नाटकं आणि बांधावर जाऊन नुसते फोटोशेशन नको, आठवडाभरात शेतकऱ्यांना शंभर टक्के नुकसानभरपाई ची तुपकर यांची मागणी

**बुलढाणा/प्रतिनिधी:** बुलढाणा जिल्हासह संपूर्ण राज्यभरात अतिवृष्टी, तर काही ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस पडत आहे, आणि सरकार केवळ बघ्यांच्या भूमिकेत दिसत असल्याचा आरोप करत, सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून आठवडाभरात शेतकऱ्यांना शंभर टक्के नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी केली आहे. तर पंचनाम्याचे केवळ नाटकं आणि बांधावर जाऊन फोटो सेशन चालणार नाही. असा इशाराही तुपकरांनी दिला आहे.

## देवेंद्र फडणवीस तुम्ही आणि तुमच्या पक्षाने ओबीसींचं आरक्षण नाकारलं होतं

### मंडळ यात्रेतून राज राजापूरकर यांचा आरोप





**शेगाव/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने नागपूरमधून मंडल यात्रेला सुरुवात झाली आहे. शरद पवार यांच्या हस्ते काल या यात्रेला सुरुवात करण्यात आली. यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली होती. त्यांच्या या टीकेला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष ओबीसीचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांनी कमंडल दाखवत मुख्यमंत्र्यांना खुलं चॅलेंज दिलं आहे. माझा खुला आरोप आहे की, देवेंद्र फडणवीस साहेब तुम्ही आणि तुमच्या पक्षाने ओबीसींचं आरक्षण नाकारलं होतं असे राजापूरकर म्हणाले.

आज मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या वतीने काढण्यात आलेली ओबीसी जनजागरण मंडल अभियान यात्रा शेगावात पोहोचली होती. यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी सेलच्या वतीने ओबीसी जनजागरण मंडल अभियान यात्रेला शरद पवार यांच्या उपस्थितीत नागपूर येथुन १० ऑगस्ट रोजी सुरुवात करण्यात आली. हि यात्रा महाराष्ट्रातील संपूर्ण ३६ जिल्ह्यात ही यात्रा जाणार आहे. आज बुलढाणा जिल्ह्यात देखील ही यात्रा पोहोचली आहे. यावेळी ओबीसी बांधवांकडून या यात्रेचे स्वागत करण्यात आले आहे. यावेळी ओबीसी च्या घोषणा देत ओबीसी ची जातीनिहाय जनगणना व्हायला पाहिजे अशी मागणी ओबीसी बांधवांनी केली. दरम्यान देवेंद्र फडणवीस साहेब तुम्ही आणि तुमच्या पक्षाने ओबीसींचा आरक्षण नाकारलं होतं, हे वास्तविक सत्य असल्याचे मत राज राजापूरकर यांनी व्यक्त केले आहे. यावेळी बोलताना त्यांनी भाजपाचे नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या टीकेला ही प्रत्युत्तर दिले. शेगाव पोचल्यानंतर सर्वप्रथम श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे मंडळी यात्रेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दर्शन घेतले यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री डॉ राजेंद्र शिंगणे माजी आमदार रेखाताई खेडेकर सहकार नेते पांडुरंगदादा पाटील, प्रसन्नजीत पाटील, संगीतराव भोंगळ आदींची उपस्थिती होती.

## पूल वाहून गेल्याने ग्रामस्थांचा संताप नदीत उतरून जलसमाधी आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील जोहरापूर देवटाकळी मार्गावरील पूल वाहून गेल्याने ग्रामस्थ आक्रमक झाले. आज ग्रामस्थांनी थेट नदीमध्ये उतरून जलसमाधी आंदोलन छेडले.

आंदोलनादरम्यान ग्रामस्थ आणि रोड विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक वाद झाला. पुलाचे काम तात्काळ सुरू करण्याचा लिखित आदेश मिळेपर्यंत पाण्याबाहेर न येण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

सदर रोड हा प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत असल्याने स्थानिक बांधकाम विभागाचे अधिकारी काहीसे निष्क्रिय राहिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. यावेळी रोड विभागाचे अभियंता संतोष पवार यांनी घटनास्थळावरून परिस्थिती वरिष्ठांना भ्रमणध्वारीद्वारे कळवली. मात्र, ''रोडचे काम कधी सुरू होणार याची स्पष्ट माहिती द्या, त्याशिवाय आम्ही आंदोलन मागे घेणार नाही,'' असा पवित्र ग्रामस्थांनी घेतला

## चिखली तालुक्यात पावसाचा कहर, अनेकांना सुरक्षित ठिकाणी हलवले

**बुलढाणा/प्रतिनिधी:** काल सकाळपासून बुलढाणा जिल्ह्यात पावसाचा हाहाकार पाहायला मिळाला, यामध्ये चिखली तालुक्यात अक्षरशा पावसाचा कहर झाला. जांबुवंती नदीला मोठा पूर आल्याने संपूर्ण चिखली शहराला पावसाचा विळखा पडला होता,




शहरातील माळीपुरा आणि दरगाह परिसरात तीन ते चार फूट पाणी तुंबल्याने अनेक घरांमध्ये पाणी शिरले, घरातील जीवनावश्यक वस्तूंसह धान्याचे मोठे नुकसान झाले आहे. परिसरातील नागरिकांना बचाव पथकामार्फत सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. तर पुढील तीन दिवस जिल्ह्याला येलो अलर्ट असल्याने चिखली शहरासह तालुक्यातील सर्व शाळा महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. आजही प्रशासन अलर्ट मोडवर असल्याच पाहायला मिळतंय.

# डॉ.मंगेश बाजड यांच्या वाढदिवसाच्या निमित्त जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

## वायफळ खर्चाना फाटा देत सामाजिक उपक्रम : विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य









दैनिक आपला विदर्भ


**डोणगाव/प्रतिनिधी:** वैद्यकीय क्षेत्राबरोबरच सामाजिक,कृषी आदी विविध क्षेत्रात समाजपयोगी उपक्रम राबवून गोरगरिबांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणारे डॉ. मंगेश पाटील बाजड यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त वायफळ खर्चाना फाटा देत वाढदिवसाच्या दिवशीही सामाजिक कार्य पार पाडले. वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप करून गोरगरिबांसोबत वाढदिवस अत्यंत साध्यापद्धतीने साजरा केला.

डोणगाव परिसरातील गोरगरीब जनतेची रुग्णसेवा करण्याबरोबरच सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या डॉ. मंगेश बाजड यांचा १४ ऑगस्ट रोजी वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात आला. डॉ. मंगेश बाजड यांनी बेरोजगारांसाठी पाटील इरिगेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध करून देत शेतीतही अमुलाग्र बदल करीत शेतकऱ्यांचा विकास करण्याचा ध्यास घेतला आहे. गोरगरिबांसाठी संपूर्ण आयुष्य खर्ची करत असलेल्या डॉ. मंगेश बाजड यांच्या वाढदिवसानिमित्त १४ ऑगस्ट रोजी वाढदिवसानिमित्त पार्टी अथवा इतर खर्चिक व बडेजाव करणारा कार्यक्रम न घेता डोणगाव परिसरातील अनेक शाळांमध्ये जाऊन चिमुकल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करून चिमुकल्यांसोबत बर्थडे सेलिब्रेशन केले आहे. वाढदिवसानिमित्त परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले असल्याने विद्यार्थ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. डॉ. मंगेश बाजड यांचा वाढदिवस म्हणजे जिल्हा परिषद शाळांमध्ये साजरा होऊन चिमुकल्यांना काहीतरी भेट मिळण्याची आशा लागून असलेल्या चिमुकल्यांनी डॉ. मंगेश बाजड यांना वाढदिवसानिमित्त आपल्या ओबडधोबड शब्दात शुभेच्छा देत डॉ. मंगेश बाजड यांच्याही चेहऱ्यावर हास्य फुलविले.तर, मंगेश बाजड यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व मिठाई वाटप करून चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवित वाढदिवस साजरा केला.यावेळी डॉ.मंगेश पाटील बाजड. डॉ. सौ.सारीका मंगेश बाजड. सुनील पळसकर. बालप्रसाद आखाडे यांच्यासह विविध वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती...

## संक्षिप्त...

### अतिवृष्टीने खरिपाची पिकं पाण्यात; सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान





**बीड/प्रतिनिधी :** बीड तालुक्यातील लिंबागणेश शिवारात चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने खरिपाची पिके पाण्यात तरंगत आहेत. या पावसाने बीड तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. फुलोऱ्यापासून शेंगा लागण्याच्या अवस्थेत असलेले सोयाबीन, मूग, उडीद ही पीक पाण्याखाली गेली आहेत. मागील चार दिवसांपासून बीड जिल्ह्यात सर्वदूर दमदार पावसाने हजेरी लावली आहे. या पावसाने पाणी प्रकल्प भरले असून, दुसरीकडे खरिपाच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी येथील शेतकरी करत आहेत.

### १ रुपयात पीक विमा योजना सरकारने पुन्हा सुरु करावी - अब्दुल सत्तार



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज्यात पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. अनेक ठिकाणी शेतीचे नुकसान झाला आहे. याबाबत कृषिमंत्री आणि मुख्यमंत्र्यांना विनंती आहे तात्काळ पंचनामे करावे. आणि शेतकऱ्याला आर्थिक मदत करावी, अशी मागणी माजी कृषिमंत्री आणि शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांनी केलेली आहे. सोबतच नव्या पिक विमा योजनेत ६०% शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे १ रुपयात पीक विमा योजना जी बंद केली आहे, ती सरकारने पुन्हा सुरू करावी आणि हवालदिलं शेतकऱ्याला धीर द्यावा. अशी ही मागणी अब्दुल सत्तार यांनी केली आहे.

### परतूर तालुक्यातील शेगाव - पंढरपूर दिंडी महामार्गाच्या श्रीष्टि येथील पुलावर पाणी



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यातील परतुर तालुक्यातल्या कसूरा नदीला तिसऱ्यांदा पूर आला आहे. या पुरामुळे शेगाव - पंढरपूर दिंडी महामार्गाच्या श्रीष्टि येथील पुलावरून पाणी वाहत असून, या पुलावरून वाहनचालकांना जीवघेणी कसरत करावी लागत आहे. दरम्यान काही गावांचा संपर्क तुटला असून, या पुरामुळे शेतीपिकांचेही मोठं नुकसानझालेआहे.

### ट्रॅक्टरवरील जीपीएस, ब्लॅक बॉक्स सक्तीविरोधात मोताळ्यात काँग्रेसचा ट्रॅक्टर मोर्चा



**बुलढाणा/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टरवर जीपीएस आणि ब्लॅक बॉक्स बसविण्याचा निर्णय मागे घ्यावा, या मागणीसाठी मोताळा तालुका काँग्रेस व काँग्रेसच्या किसान सेलच्या वतीने ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला.. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्वतः ट्रॅक्टर चालवत मोर्चाचे नेतृत्व केले आहे.

# शिवसेना आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवस औचित्याने मेहकरमध्ये कांगणे सरांचे मोलाचे मार्गदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी:** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसाच्या शृंखलेनिमित्त आणि शहर प्रमुख किशोर गारोळे यांच्या पुढाकाराने मेहकर येथे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. विठ्ठल कांगणे (परभणी) यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी बोलताना आ. सिद्धार्थ खरात म्हणाले की कांगणे सरांच्या मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उर्जा व आत्मविश्वास संचारला. ग्रामीण व गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांना अल्प ट्युशन फी मध्ये सक्षम बनवून मोठ्या सरकारी पदांवर पोहोचविण्याचे त्यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात आदर्शवत ठरले आहे. त्याच प्रेरणेचा लाभ मेहकरच्या





तरुणाईलाही व्हावा या उद्देशाने हा कार्यक्रम पार पडला.

मेहकरमधील तरुणाईचा उत्साह मॅरेथॉन स्पर्धेत जाणवला होता, त्याच उत्साहाने हा मार्गदर्शन सोहळा पार पडल्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण व दिशादर्शन देण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहीन, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, अतिवृष्टीमुळे मेहकर मतदारसंघात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेती वाहून गेली असून अनेक रस्ते खचले आहेत. त्यामुळे शासनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी आमदार खरात यांनी या व्यासपीठावरून केली.

या कार्यक्रमात काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस म्हणून पुनर्नियुक्त झालेले श्याम उमाळकर आणि प्रदेश उपाध्यक्ष म्हणून नियुक्त झालेले लक्ष्मणदादा घुमरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रदीप देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष दत्ता घनवट, काँग्रेस नेते अनंतराव वानखेडे, युवा सेना तालुका अधिकारी आकाश घोडे, काँग्रेसच्या आरती दीक्षित, महिला आघाडी शहर संघटक पोर्णिमा गवई, माजी सभापती भास्करराव गारोळे, संदीप गारोळे, संदीप गवई, संजय वानखेडे, माजी नगरसेवक शैलेश बावस्कर, नंदू बोरे, पत्रकार विनोद बोरे आदी मान्यवरांसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सुप्रसिद्ध साहित्यिक व कवी अजीम नवाज राही यांनी केले.



आमदार सिद्धार्थ खरात यांचे बंधू व सहपरिवार यांनी दिल्या दै.आपला विदर्भ ला पुढील वाटचालीस शुभेच्छा..!



आमदार सिद्धार्थ खरात साहेब यांचा परिवार दैनिक आपला विदर्भ चे विमोचन करतानाचे छायाचित्र



सर्व धर्म समभावाचे प्रतीक आमदार सिद्धार्थ खरात..!



विठुरायाच्या दिंडीत आमदार सिद्धार्थ खरात यांची केली पाई वारी..!

## पत्रकारांना विमा सुरक्षा कवच प्रदान

**मेहकर/प्रतिनिधी:** मेहकर-लोणार मतदार संघाचे लाडके आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त जनसामान्यांच्या अन्यायाला वाचा फोडून त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या मेहकर-लोणार तालुक्यातील पत्रकारांना ७.५० लाख रुपयांचा अपघाती विमा सुरक्षा कवच देण्यात आला आहे.

आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे १९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) मेहकर शहर प्रमुख किशोर भास्करराव गारोळे यांच्यावतीने सुरक्षा विमा सुरक्षा कवच कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात मेहकर लोणार मतदारसंघातील पत्रकारांना ७.५० लाख रुपयांचा अपघाती विमा उतरविण्यात आला. विशेष म्हणजे मेहकर लोणार मतदारसंघात आतापर्यंत कोणत्याही लोकप्रतिनिधींना सामाजिक उपक्रम राबविला नाही. मात्र, आमदार सिद्धार्थ खरात यांनी सामाजिक उपक्रम राबवून वाढदिवसानिमित्त गोरगरीब जनतेसह सर्वांनाच वाढदिवसाची भेट दिली आहे.

# मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांची राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट

### अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा घेतला आढावा

**बुलडाणा/प्रतिनिधी:** राज्यात अनेक ठिकाणी सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्कालीन कार्य केंद्राला भेट देऊन अतिवृष्टीमुळे राज्यात उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला.

मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी या भेटी वेळी राज्यात अतिवृष्टीमुळे निर्माण परिस्थितीची माहिती घेऊन पावसामुळे उद्भवलेली पूरस्थिती, वाहतुकीतील अडथळे, पिकांचे नुकसान आणि आपत्कालीन सेवांच्या कार्यवाहीची माहिती घेतली. आवश्यक तेथे राज्य आपत्ती प्रतिसादात दल व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके पाठवावीत अशा सूचना त्यांनी दिल्या.

अतिवृष्टीमुळे नदीकाठच्या लोकांचे स्थलांतर सुरक्षितस्थळी करावे. या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात. यासाठी प्रशासनाने वेगाने कारवाई करावी, आशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

पावसामुळे बाधित होणाऱ्या शेत पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, अतिवृष्टी काळात विशेषतः नद्या, धरणे व



पाणीपातळीवर सतत लक्ष ठेवून आवश्यकतेनुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना करून हवामान विभागाशी सतत संपर्क साधून येणाऱ्या पावसाचा अंदाज जनतेपर्यंत वेळीच पोहचवण्यात याव्यात असेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.

राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण यांनी अतिवृष्टीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, मदत व बचाव कार्य या विषयी माहिती दिली.

# चिखली तालुक्यातील १० महसूली गावांत सेविका व मदतनिस पदाची पदभरती

**बुलडाणा/प्रतिनिधी:** एकात्मिक बाल विकास सेवा योजना ग्रामिण प्रकल्प चिखली अंतर्गत १० महसूली गावांत १ सेविका व १० मदतनीस असे एकूण ११ रिक्त पदाची भरती होणार आहेत. या पदाकरीता दि. २८ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज स्विकृत केले जाणार असून इच्छुक १२ वी पास स्थानिक महिला उमेदवारांनी अर्ज सादर करावा, असे आवाहन बाल विकास प्रकल्प अधिकारी राजेश वाघ यांनी केले आहे.

अर्जासोबत तहसिलदार, चिखली यांचा रहिवासी दाखला जोडणे आवश्यक आहे. भरती प्रक्रिया अटी व शर्तीनुसार पारदर्शकपणे पार पाडली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही आमिषाला बळी पडू नये व कोणत्याही गैरमार्गाचा वापर करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

सेविका पदासाठी महसुली गाव ऐनखेड येथे एक पद, तसेच मदतनिस पदासाठी अमडापूर येथे दोन पद, तर रोहडा, कोलारा, सोनेवाडी, आमखेड, नायगांव बु., ब्रम्हपूरी, डोंगरगाव व गोद्री या महसूली गावात प्रत्येकी एक याप्रमाणे असे सेविका व मदतनिस ११ रिक्त पदे भरती केली जाणार आहे. यामुळे महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होत होऊन अंगणवाडी सेवांद्वारे बालक, गर्भवती व माता यांना चांगल्या सुविधा मिळण्यास मदत होणार आहे.

